**कोर्ट विद्यमान १ ले न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी वर्धा समक्ष**

**समरी फौज.केस कं.3829/२०२५** **पे.ता. 23-०१-२०२६**

तिरूपती अर्बन--**विरुध्द**--रुपेश भोयर

**फिर्यादी-संस्थेतर्फे पडताळणीसह सरतपासणीवर शपथपूर्वक साक्ष :**

मी देवाची शपथ घेवून प्रतिज्ञापूर्वक खरे सांगतो की,

माझे नांव - चंद्रकांत विठ्ठलराव गावंडे
वय- ५६ वर्षे, धंदा- नोकरी,
राहणार- द्वारा तिरुपती अर्बन को ऑफ बँक लि.शाखा वर्धा आर्वी नाका जवळ,वर्धा,तह- जिल्हा -वर्धा

१. मी वरील पत्यावर राहत असून कायमचा रहिवासी आहे व मी सद्या तिरुपती अर्बन को ऑफ बँक लि.शाखा वर्धा येथे अधिकृत अधिकारी / वसूली अधिकारी तथा शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहे. मला बॅकेकडून सदर केसमध्ये हजर राहून संपूर्ण कोर्टकारवाई व साक्ष पुरावे, समेट करणे इत्यादी आवश्यक असलेली कामे करण्याचे अधिकार दिलेले आहे, यातील संपूर्ण मजकूर मी सांगितल्याप्रमाणे लिहीले असून बरोबर आहे. आरोपी हा **सिंदी मेघे वर्धा,**वार्ड नं.५ ता. जि. वर्धेचा रहिवासी असून तो बॅकेचा नाममात्र सभासद आहे. आरोपीने त्यांच्या बददल व सदर प्रकरणात असलेल्या जामीनदाराबददलची पुर्ण माहिती बॅकेत कर्ज घेतेवेळी पुरविलेली आहे.

२. सदर आरोपीने आमचे बॅकेकडून **रुपये १८,००,०००/- टम लोन स्वतःच्या व्यवसायाकरीता कर्ज १०** वर्षा करीता द.सा.द.से.१० टक्के व्याज दराने रु. **२३,७८७/-** प्रती हप्ताच्या कबुलीने धंदा वाढीकरीता श्रीमहालक्ष्मी किराणा ॲन्ड जनरल स्टोअर्स या नावाने असलेल्या व्यवसाय वृध्दीकरीता कर्ज घेतलेले असुन तो सदर व्यवसाय सुरळीत फायदयानिशी चालवित आहे. सदर कर्ज मिळण्या

ORDER

Witness present before Court today deposed the contents of his affidavit to be true & correct. Hence, it is Read & Recorded.
Sd/-
JMFC
23/01/2026

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.01.23 17:08:17 +0530

करिता दिनांक ०१-०८-२०२२ रोजी अर्ज करुन कर्ज उचल केलेली आहे. सदरचे कर्ज घेतेवेळी बॅकेच्या अटी व शर्ती आरोपीने मान्य व कबूल केल्या होत्या व संबंधित सर्व दस्ताऐवजांवर व करारनाम्यावर,वचन चिठठी,कर्जचा करारनामा इत्यादी आरोपीने वाचून व समजून सहया केल्या होत्या. ते सर्व संबंधित दस्ताऐवज बॅककडे उपलब्ध आहे. परंतु शर्ती व अटीप्रमाणे कबूल केल्यानंतरही आरोपीने कर्जाच्या नियमित ठरल्याप्रमाणे हप्त्यांची परतफेड केली नाही. याबाबत आरोपीस ब-याचवेळा फोनद्वारे सूचना,लेखीपत्र दिली असता आरोपी बॅकेकडे आला व त्याच्याकडे असलेल्या थकीत व्याजासह कर्ज रक्कमेची परतफेड करण्याकरिता बॅकेच्या हक्कात धनादेश कमांक **३०८१३६** दि. **१९-०५-२०२५ बॅक, आय.सी.आय.सी.आय.** बॅक वर्धा शाखा शिवाजी चौक वर्धा **चा** रक्कम रु **१७,५५,७००/-** स्वत:च्या सहीनिशी बॅकेच्या नावाने दिला. सदर धनादेश अभिलेखावर आरोपीचे सहिनिशी असलेले पेश केलेला आहे त्यास निशानी कमांक --देण्यात यावे. सदर धनादेश बॅकेने रक्कम वटविण्याकरिता तिरुपती अर्बन को ऑफ बॅक लि.शाखा वर्धा म्हणजेच आमच्याच बॅकेत कर्ज खात्यामध्ये दि.**१९-०५-२०२५** रोजी जमा केलेल्या तिरुपती अर्बन को ऑफ बॅक लि.शाखा वर्धाची जमा पावती अभिलेखावर दाखल आहे त्यास निशानी क---देण्यात यावे. सदर रक्कम आरोपीचे **बॅक, आय.सी.आय.सी.आय.** बॅक वर्धा शाखा शिवाजी चौक वर्धा बॅकेतील खात्यात धनादेशाचे रोखीकरण होईल या उद्देशाने सदर धनादेश फिर्यादीचे खाते असलेल्या बॅकेत जमा केला असता आरोपीचे बॅकेकडून धनादेश परतीच्या मेमोमध्ये Fund Insufficient या शिर्षकाखाली सदरचा धनादेश न वटता परत आला याबाबत आरोपीच्या बॅकेचे धनादेश परतीचा मेमो

दि. २०-०५-२०२५ रोजीचा विद्यमान कोर्टात पेश केलेले आहे त्यास निशानी क्रमांक---देण्यात यावे. तसेच संस्थेचे खाते असलेल्या तिरुपती अर्बन को ऑफ बॅक लि.शाखा वर्धा बॅकेचे सूचना पत्र व दिलेले स्मरणपत्र अभिलेखावर प्रस्तुत आहे त्यास निशानी क्र--देण्यात यावे.

३. यानंतर बॅकेंतर्फे मी आमचे वकीलाचे मार्फत दिनांक २७-०५-२०२५ रोजी नोटीस पंजीबध्द डाकेने पोचपावतीसह आरोपीचे पत्यावर धनादेशाचे रुपये १७,५५,७००/- रक्कमेची मागणी करणारे नोटीस पाठविले व त्यामध्ये नमूद केले की, सदरची रक्कम नोटीस मिळताच १५ दिवसात बॅकेस परत करावी, सदर नोटीस दिनांक २८-०५-२०२५ रोजी मिळूनही आरोपीने सदर रक्कम परत केली नाही वा नोटीसला उत्तरही दिले नाही. त्या सदर नोटीसवर बॅकेतर्फे माझी व आमचे बॅकेचे वकील साहेबांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास निशानी क्रमांक---देण्यात यावे. तसेच आरोपीला नोटीस पाठविल्याबाबतची पोष्टाची पावती ता.२७-०५-२०२५ ची अस्सल पावती व पोष्टाची पोहच पावती अभिलेखावर पेश आहे तसेच इतरही सर्व दस्तांना अनुक्रमे निशानी क्रमांक ---देण्यात यावे.

४. सदरहू नोटीस माहिती मिळाल्यानंतरही आरोपीने रक्कमेची परतफेड केली नाही तसेच बॅकेत येवून विचारणा किंवा खात्याचे समायोजन करण्याबाबत, जशी जमेल तशी थोडी थोडी रक्कम देण्याचे प्रयत्न केले नाही व जाणीवपूर्वक आपले स्वत:चे बॅकेच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने fund Insufficient या

शिर्षकाखाली सदर धनादेशाचे रोखीकरण न झाल्याने बॅकेची फसवणूक केली आहे, सदर कारण माहित पडताच आम्ही आरोपीशी संपर्क साधला असता तीने उपहासात्मक हास्य करुन उध्दट उत्तर दिले असे गैरकृत्य केल्यामुळे आरोपीविरुध्द निगो.इन्स्टियुमेंन्ट कायद्याचे कलम १३८ अन्तर्गत आरोपीविरुध्द न्यायालयान्तर्गत योग्य कार्यवाही करण्यात येईल असे सूचविले होते. अशारितीने आरोपीने आमचे बॅकेला दिलेल्या धनादेशाचे रोखीकरण न होता अनादरीत झाले, अशा प्रकारे आरोपीने जाणूनबूजून व हेतुपुरस्सर लबाडी करुन आमचे बॅकेची फसवणूक केली व अश्या प्रकारचे गैरकायदेशिर कृत्य हे निगो.इन्स्टियुमेंट ॲक्टचे कलम १३८ सहनियम १४२ अन्तर्गत गुन्हा ठरतो व त्यासाठी आरोपीस शिक्षा व दंड सुध्दा करण्यात यावे. या व्यतिरिक्त दावेअर्जात संपूर्ण माहिती सविस्तर लिहीलेली आहे ती विचारात घेण्यात यावी ही विनंती.

५. अशा प्रकारे आरोपीने धनादेशाचे जाणून बूजून अनादरण केले आहे. आरोपी बॅकेचे खात्यात चेकचे आदर होईल इतकी रक्कम शिल्लक नसतांनाही, स्वत:चे बॅकखात्यात पुरेशी रक्कम न ठेवता आरोपीने जाणूनबूजून आमचे बॅकेस नुकसान पोचविण्याचे हेतुने लबाडी केली व बॅकेला स्वत: आरोपीचे सहीने चेक देवून आरोपीने बॅकेची फसवणूक केल्याबाबत आरोपीला बॅकेच्या तकारीत नमूद केल्याप्रमाणे कायद्याने शिक्षा व्हावी व बॅकेला न्याय मिळावा व बॅकेची रक्कम व्याज व खर्चासह परत मिळावी व आरोपीविरुध्द कायदेशिर कठोर शिक्षा व दंड व्हावे, असे विद्यमान न्यायालयाने आदेश द्यावा ही विनंती.

वर्धा

दिनांक : २३-०९-२०२४

शपथपत्र करणार

Tirupati Urban Co-op. Bank Ltd. Wardha, Naka, Gandhi Nagar

५ रु. न्यायालय फी COURT FEE Rs.5 भारत INDIA पाँच रुपये FIVE RUPEES

## सत्यापन

मी चंद्रकांत विठ्ठलराव गावंडे,वय ५६वर्षे, व्यवसाय-नोकरी व्यवस्थापक /वसूली अधिकारी द्वारा तिरुपती अर्बन को ऑफ बॅक लि.शाखा वर्धा आर्वी नाका जवळ,वर्धा,तह- जिल्हा -वर्धा प्रतिज्ञापूर्वक सत्यापित करतो की, वरील शपथपत्रातील सर्व माहिती बॅकेकडे उपलब्ध असलेल्या अभिलेखाप्रमाणे व माझे सूचने व माहितीप्रमाणें बरोबर लिहीलेला आहे. सदर वरील संपूर्ण मजकूर खरा आहे. हे मी वाचून व समजून खात्री केली.

करिता आज वर्धा मुक्कामी दिनांक २३-०१-२०२६ रोजी खरेपणाची खात्री करुन शपथपत्रावर सही केली.

सत्यापक

मी सत्यापन करणार ह्यास ओळखतो त्यानी माझे समक्ष वाचून व समजून सही केली.

(ॲड. जी.एस.जावंधिया)
वर्धा

23rd day of Jan 26 Age-56
Chandrakant Vitthl Gawande R/o Wardha,
identified before me by Adv. G.S. Jawandhiya Tal. & Dist. Wardha

Asstt. Supdt.
C.J.M. Wardha
23/1/26

22/01/26